ज्या भागधारकांचे समभाग (शेअर्स) गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी प्राधिकरण (IEPF) कडे हस्तांतरित झालेले आहेत त्यांनी आपले शेअर्स किंवा डिव्हिडंड रक्कम परत मिळविण्याकरिता खालिल सूचनांचे अवलोकन करावे.

(इन्वेस्टर कॉर्नर) मधील https://www.mahabeej.com/steps-to-claim-dividend-shares-iepf.pdf या लिंकवर जाऊन भाग-2 नुसार दिलेल्या सुचनांचे अवलोकन करुन अर्ज भरावा.

संलग्नता (Attachment) (भागधारकांनी अर्जासोबत खालील संलग्नता/सहपत्रे जोडावित.)

1) दावेदाराचे आधार कार्ड आणि संयुक्त धारक असल्यास सर्व संयुक्त धारकांच्या आधार कार्डची प्रत (अनिवार्य)
2) परदेशी आणि अनिवासी भारतीय बाबतीत पासपोर्ट, ओसीआय आणि पीआयओ कार्ड (अनिवार्य)
3) दावेदार/पक्षकाराच्या डी-मॅट खात्याची मास्टर यादी (अनिवार्य)
4) पात्रतेचा पुरावा (बॉन्डस्/कर्जरोखे/फिक्स्ड डिपॉझिट पावत्या/शेअर प्रमाणपत्र/व्याज वॉरंट/डिव्हिडंड वॉरंट, अर्ज क्रमांक/व्यवहाराचे विवरण इ.) अनिवार्य
5) जामिनाच्या स्वरुपात प्रतिज्ञापत्र
6) वैकल्पीक संलग्नता

   भागधारकाचा मृत्यू झालेला असल्यास खालील संलग्नक/सहपत्र जोडणे अनिवार्य आहे.
7) मृत्यू प्रमाणपत्राची नोटरीकृत प्रत.
8) नोटरीकृत उत्तराधिकार प्रमाणपत्र/मृत्यूपत्र खरे असल्याचा कोर्टाचा दाखला (प्रोबेट)/मृत्यूपत्र (विल)
9) इतर धारकाकडून ना हरकत प्रमापत्र
10) ट्रान्समिशनसाठी रीतसर नोटरीकृत नुकसानभरपाई (Indemnity) बाँड

## भाग-3 यशस्वी सादरिकरण/सबमिशनसाठी महत्वाचे मुद्दे

### शुल्क नियम

IEPF-5 फार्म भरल्यानंतर भागधारकांनी प्राधिकरणाकडे दाखल केलेला फार्म/अर्ज हा मुळ/ओरिजनल कागदपत्र व पावतीसह कंपनी सचिव, महाबीज अकोला यांचेकडे 25 दिवसांच्या आत दाखल करण्यात यावा.

**<u>ई- पडताळणी अहवाल</u>**

**ई-व्हेरिफिकेशन अहवाल दाखल करण्यात विलंब झाल्यास शुल्कासाठी खालील सारणी लागू होईल:**

| अ. क्र. | अर्जाची तारिख | विलंब कालावधी | अतिरिक्त शुल्क देय (रु. मध्ये) |
|---|---|---|---|
| 01 | IEPF-5 भरण्याची तारिख | 30 दिवस | रु. दररोज 50 कमाल रु. 2500/- पर्यंत |

## IEPF-5 SRN चा मागोवा घ्या

**प्रणालीने तयार केलेले नुकसानभरपाई (Indemnity) बाँड, आगाऊ पावती, IEPF-5 ची पोचपावती आणि सबमिट केलेल्या IEPF-5 वेब फॉर्मची pdf आवृत्ती MCS वेबसाईटवर उपलब्ध 'ट्रॅक IEPF-5 SRN' सेवेवरुन डाऊनलोड केली जाऊ शकते.**

**<u>प्रकिया प्रकार</u>**

**ईफॉर्मवर आयईपीएफ सेल (नॉन एसटीपी) व्दारे प्रक्रिया केली जाईल. ईफॉर्मवर प्रक्रिया केल्यावर तपशील MCA कडे जतन केला जाईल.**

**<u>ईमेल</u>**

**ई-फॉर्म अपलोड झाल्यानंतर (सामान्य भरणे किंवा पुन्हा सादरिकरणाच्या बाबतीत), दावेदारासाठी ई-व्हेरिफिकेशन रिपोर्ट अपलोड करण्यासाठी कंपनीच्या नोडल अधिकाऱ्याकेडे ईमेल सूचना जाईल. जेव्हा एखादा ई-फॉर्म संबंधित प्राधिकरणाव्दारे मंजूर/ नाकारला जातो, तेव्हा त्याची पोचपावती वापरकर्त्याला ईमेलच्या स्वरुपात पाठविली जाते.**

## आवेदनाबाबत चौकशी

**लॅन्डलाईल क्रमांकः- (0724) 2455093, 2452060**

**टोल फ्री क्रमांकः- 1800 233 8877**